नमस्कार शेतकरी मित्रांनो, 🌱आपल्या Krushi Mitra Satish वेबसाइटवर आपले स्वागत आहे. आज आपण खरबूज लागवड (muskmelon) या संदर्भात माहिती पाहणार आहोत या मध्ये आपण लागवड ते काढणी सर माहिती सविस्तर पाहणार आहोत.

सध्याच्या बाजारपेठेतील वाढत्या मागणीमुळे अनेक शेतकरी मित्र खरबूज लागवडीकडे आकर्षित होत आहेत. कारण अवघ्या **2.5 महिन्यांत** उत्तम नफा देणारे हे एक फायदेशीर पीक आहे.

### 🌞 खरबूज लागवडीसाठी योग्य हवामान 🌞

✅ **24-26°C** तापमान खरबूज लागवडीसाठी सर्वोत्तम मानले जाते, त्यामुळे बहुतांश लागवड **उन्हाळ्यात** केली जाते.

🚫 **18°C पेक्षा कमी आणि 32°C पेक्षा जास्त तापमान** वेलीच्या वाढीवर आणि फळधारणेवर विपरीत परिणाम करू शकते.

⚠️ **अत्यंत कमी तापमानात (18°C खाली) बियाण्यांची उगवण नीट होत नाही**, त्यामुळे योग्य हवामान लक्षात घेऊन लागवड करावी.

### 🌱 खरबूज लागवडीसाठी योग्य जमीन 🌱

✅ **रेतीयुक्त आणि सुपीक जमीन** खरबूज लागवडीसाठी सर्वोत्तम मानली जाते.

💧 **पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन** असेल तरच लागवड यशस्वी होते, कारण पाण्याची जास्त झाल्यास यापिकामध्ये विलटिंग समस्या वाढते.

⚠️ चिकट किंवा जड मातीपेक्षा **सुटसुटीत आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध जमीन** चांगली उत्पादन देते.

### 🍈 खरबूज लागवडीसाठी प्रमुख वाण (जाती) 🍈

✅ नोन यू सीड्स कुंदन
✅ नुन्हेम्स लालपूर
✅ नोन यू सीड्स बॉबी
✅ सागर सीड्स विजय
✅ सागर सीड्स चंदन

### 🌱 खरबूज लागवडीची योग्य पद्धत 🌱

📅 **लागवडीसाठी सर्वोत्तम कालावधी**

✅ **जानेवारी-फेब्रुवारी** महिना सर्वोत्तम असतो.

✅ **मार्च महिन्यातही** लागवड करता येते, परंतु उष्णतेच्या तीव्रतेचा विचार करून योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

📏 **योग्य अंतर आणि रोप व्यवस्थापन**

➡️ **5-6 फूट बेड अंतर** आणि **1.25 फूट रोपांतरी अंतर** उत्तम राहील.

💧 **ड्रिप डिस्चार्जपासून 3-4 इंच ओल करून रोपांची लागवड करावी**, त्यामुळे मुळे लवकर सक्रिय होतील आणि चांगली वाढ होईल.

🌿 **खरबूज लागवडीसाठी योग्य खत व्यवस्थापन** 🌿

✅ **ड्रिप सिंचन प्रणालीमुळे बहुतांश ठिकाणी ड्रिपद्वारे खत व्यवस्थापन केले जाते.**

✅ **प्रारंभिक टप्प्यात बेसल डोस देणे आवश्यक आहे, त्यानंतर उर्वरित खते ड्रिपमधून दिली जातात.**

📌 **बेसल डोस (मुळखत) - लागवडीच्या वेळी जमिनीत मिसळण्यास योग्य खते:**

| **डोस** | **खताची नावे** |
|---|---|
| **बेसल डोस** | 🔹 **नीम पेंड** – 100 किलो<br>🔹 **DAP (18:46:00)** – 2 बॅग<br>🔹 **पोटॅश** – 1 बॅग<br>🔹 **सल्फर 90%** – 10 किलो<br>🔹 **$MgSO_4$ (मॅ)ग्नेशियम सल्फेट)** – 5 किलो<br>🔹 **झिंक सल्फेट** – 5 किलो<br>🔹 **मायकोरायझा (Mycorrhiza)** – 4 किलो<br>🔹 **रीजेंट (फिप्रोनिल 0.3% GR)** – 5 किलो (जमिनीतील कीटक नियंत्रणासाठी)<br>🔹 **Patil Biotech NPK Conso G** – 40 किलो |

🌿 **खरबूज लागवडीतील खत व्यवस्थापन (ड्रिपद्वारे)** 🌿

✅ **प्रथम 12-15 दिवस आळवणी (Drenching) करावी. त्यानंतर विद्राव्य खते (Water Soluble Fertilizers) ड्रिपने टप्प्याटप्प्याने सोडावीत.**

**खालील टेबल मध्ये 3 महत्वाच्या आळवण्या बद्दल माहिती दिली आहे.**

| **आळवणी** | **प्रॉडक्टची नावे** |
|---|---|
| **4 थ्या दिवशी** | **Humic acid 500 ग्रॅम + ट्रायकोडर्मा - 2 लिटर 300 लिटर पाणी** |

| | |
|---|---|
| **7-8 दिवशी** | **19.19.19 - 2 किलो + bavistin 250 ग्राम + हमला 500 मिलि 400 लिटर पाणी .** |
| **12-14 दिवशी** | **12:61:00 - 3 किलो + पूर्वा मीलांज - 2 किलो + ग्रोवर - 500 मिलि 400 लिटर पाणी** |

✅ **कलिंगड पिकामध्ये काही अत्यंत महत्वाची खते आपल्याला खाली सांगितल्या प्रमाणे द्यावे.**

📅 **15-20 दिवसाच्या अंतराने**

- **कॅल्शियम नायट्रेट - 5 किलो**
- **बोरॉन - 1 किलो**

📅 **25-30 दिवसाच्या अंतराने (सूक्ष्म अन्नद्रव्ये पूरकता)**

- **मायक्रोन्युट्रिएंट्स - 500 ग्रॅम ते 1 लिटर**
- **मॅग्नेशियम सल्फेट ($MgSO_4$) – 3 किलो**

📅 **फळ परिपक्वता कालावधी (Healthy Fruit Development)**

- **चिलेटेड फेरस (Chelated Ferrous) – 500 ग्रॅम**

✅ **खालील टेबल नुसार ड्रिपद्वारे खत नियोजन करावे:**

| दिवस | खताची नावे आणि प्रमाण (आलटून पालटून) 7 किलो | खताचे कार्य |
|---|---|---|
| 📅 15-30 दिवस | ◆ 19:19:19 – 10 किलो<br>◆ 12:61:00 – 15 किलो | वेलींच्या सुरुवातीच्या वाढीसाठी |
| 📅 30-45 दिवस | ◆ 13:40:13 – 15 किलो<br>◆ 00:52:34 – 15 किलो | फुलधारणा आणि फळधारणा वाढीसाठी |
| 📅 45-60 दिवस | ◆ 00:52:34 – 15 किलो<br>◆ 13:00:45 – 15 किलो | फळांची वाढ आणि पोषणासाठी |

| | | |
|---|---|---|
| 📅 60-75 दिवस | 🔹 00:52:34 – 15 किलो<br>🔹 00:00:50 – 15 किलो | फळांच्या गुणवत्तेसाठी |
| 📅 75-80 दिवस | 🔹 00:00:23 – 5 किलो | गोडवा आणि रंग सुधारण्यासाठी |

💧 **खरबूज लागवडीतील पाणी व्यवस्थापन** 💧

✅ **प्रारंभिक टप्प्यात आणि वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य पाणी व्यवस्थापन केल्यास उत्पादन आणि फळांची गुणवत्ता सुधारते.**

📌 **लागवडीपूर्वी**

🔹 **बेड पूर्णपणे 75-80% ओला करून घ्यावा** – त्यामुळे मुळे लवकर सक्रिय होतील आणि उगवण चांगली होईल.

📌 **लागवड केल्यानंतर (पहिले 10-15 दिवस)**

🔹 **लागवडीनंतर 10-15 दिवस नियमित पाणी द्यावे**
🔹 **त्यानंतर 2 दिवस पाणी देऊ नये** – त्यामुळे मुळे जमिनीत खोलवर जातात आणि चांगली पकड घेतात.

📌 **4 था दिवस ते वाढीचा टप्पा (15-40 दिवस)**

🔹 **चौथ्या दिवसापासून 15-20 मिनिटे पाणी द्यावे.**
🔹 **वाढीच्या टप्प्यानुसार 5-10 मिनिटांनी हळूहळू पाणी वाढवत जावे.**

📌 **फळ फुगवणी काळ (40-70 दिवस)**

🔹 **या कालावधीत 2 ते 2.5 तास ड्रिपने पाणी द्यावे.**
🔹 **पाणी योग्य प्रमाणात दिल्यास फळांचे वजन आणि आकार सुधारतो.**

📌 **फुलोऱ्याच्या अवस्थेत (30-40 दिवस)**

🔹 **या टप्प्यावर पाण्याचा थोडासा ताण द्यावा.**
🔹 **जास्त पाणी दिल्यास फुलगळ होऊ शकते आणि उत्पादनावर परिणाम होतो.**

✅ **योग्य वेळेत आणि योग्य प्रमाणात पाणी दिल्यास खरबूज पिकाची वाढ निरोगी होते आणि उत्पादन अधिक चांगले मिळते.** 🌿 💦

**🔰 खरबूज पिकातील कीड आणि रोग व्यवस्थापन 🔰**

खरबूज पिकात प्रमुख पांढरी माशी, मावा, थ्रिप्स, तुडतुडे, फळमाशी, बिट्टल, पाने खाणारी अळी, फळपोखरणारी अळी या किडी आणि पावडरी मिल्ड्यू, करपा, पानावरील ठिपके, आकस्मिक मर, हे रोग आणि व्हायरस अशा समस्या शेतकऱ्यांसमोर येतात. त्यामुळे स्क्रीन वरील चार्टमध्ये मी तुम्हाला खरबूज फवारणी वेळापत्रक दाखवत आहे, तुम्ही त्याचा स्क्रीनशॉट काढून घेऊ शकता.

| **दिवस** | **कृषि निविष्टची नावे आणि प्रमाण** |
|---|---|
| 5-6 दिवस | Confidor 0.5 मिली + एम 45 - 2 ग्रॅम + बायोवीटा 2 मिली |
| 11-12 दिवस | अलिका - 1 मिली + बावीसटिन - 1 ग्रॅम + ऑक्सिजन - 2.5 मिलि + स्टिकर 0.5 मिलि |
| 18-22 दिवस | उलाला 0.4 ग्रॅम + antracol - 2.5 ग्रॅम + isabion 2 मिलि + स्टिकर 0.5 मिलि |
| फाळमाशी 21-25 दिवशी | Bactrocera Cucurbitae lure आणि glass trap लावावे 8-10 एकरी |
| 25 -30 दिवस | बायो 303 - 2 मिली + बोनस 2 मिलि + 12:61:00 - 75 ग्रॅम + स्टिकर 0.5 मिलि |
| 35-40 दिवस | डेलीगेट - 1 मिली + अमिस्टर टॉप - 1.5 मिलि + मायक्रोनुट्रीएंट्स 1ग्रॅम + स्टिकर 0.5 मिलि |
| 50-55 दिवस | 00:52:34 - 75 ग्रॅम + लूना एक्सपीरियंस - 1 मिलि + पीआई फॉस्माइट -2.5 मिलि + स्टिकर 0.5 मिलि |

| | |
|---|---|
| 60-70<br><br>दिवस | सिग्नम - 1.6 ग्रॅम + मेओथ्रिन 0.5 मिलि + स्टिकर 0.5 मिलि |

**सारांश :**

खरबूज हे अवघ्या 2.5 महिन्यांत उत्तम नफा देणारे पीक आहे, त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर याकडे वळत आहेत. योग्य तापमान (24-26°C) आणि सुपीक, रेतीयुक्त जमीन लागवडीसाठी उपयुक्त ठरते. योग्य अंतर राखून, ड्रिप सिंचन आणि संतुलित खत व्यवस्थापन केल्यास उत्पादन चांगले मिळते. तसेच, फळधारणेसाठी पोषक तत्त्वे आणि कीड-रोग नियंत्रणासाठी वेळेवर फवारणी करणे आवश्यक आहे. शास्त्रशुद्ध पद्धतीने खरबूज लागवड केल्यास दर्जेदार उत्पादन आणि अधिक नफा मिळवता येतो. 🌱🍈

**प्रश्न आणि उत्तर -**

**खरबूज लागवड कधी करावी?**

खरबूज लागवड उन्हाळ्यामध्ये जानेवारी ते मार्च पर्यन्त करू शकता.

**खरबूज टॉप 5 वाण कोणते आहे?**

नोन यू सीड्स, कुंदन नुन्हेम्स,लालपूर नोन यू सीड्स बॉबी, सागर सीड्स विजय आणि सागर सीड्स चंदन

**खरबूज पिकात पहिली आळवणी कोणती घ्यावी?**

Humic acid 500 ग्रॅम + ट्रायकोडर्मा - 2 लिटर 300 लिटर पाण्यात मिसळून पहिली आळवणी घ्यावी.

**खरबूज पिकामध्ये फळमाशी (fruit fly) साठी कोणते सापळा आणि ल्युर लावावी?**

**बॅक्टोसेरा कुकरबिटे (Bactrocera Cucurbitae) आणि ग्लास ट्रॅप लावावे.**

लेखक -
सतीश सोनवणे
मुपो. नांदगाव, तालुका - नगर,
जिल्हा - अहमदनगर